# पाचोरा येथे राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचा समारोप

■ **पाचोरा । प्रतिनिधी**

येथील निर्मल इंटरनैशनल स्कूलमध्ये सुरु असलेल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचा शानदार समारोप झाला असून गेल्या तीन दिवसापासून सुरु असलेल्या स्पर्धेत निर्मल इंटरनैशनलच्या १९ वर्षाखालील मुलींच्या संघासह कोल्हापूर (१९ वर्ष मुले) शांती निकेतन शाळा तसेच कॉटीश परभणी (१७ मुली) आणि सेंट्रल काऊंली शाळा, नागपूर (१७ मुले) यांनी आपापल्या गटात अजिंक्य राहुन राज्यस्तरीय मानाचा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले.

गोवा आणि महाराष्ट्र राज्यातील ९ विभागातील सिबीएस्सी पॅटर्नच्या शाळांचे १९ वर्षे आणि १७ वर्ष वयोगटातील मुले आणि मुली अशा २ विभागात ४ गटात हे चुरशीचे सामने निर्मल इंटरनॅशनल स्कूलच्या प्राटांगणात २२ सप्टेंबर पासून सुरु होते. मॅट प्रकारात झालेल्या या स्पर्धेत सीबीएस्सीच्या ५६ नोंदणीकृत शाळापैकी ४२ संघानी सहभाग घेतला होता. स्पर्धा निरीक्षक डॉ. बाबासाहेब उलपे यांच्या निरीक्षणात हे सामने पार पडले. बक्षीस वितरण सोहळा शाळेच्या ग्राउंडवर संपन्न झाला. यावेळी शाळेच्या चेअरमन सौ. वैशालीताई सुर्यवंशी, सचिव नरेंद्रसिंह सुर्यवंशी, प्राचार्य भगवान सोमवंशी, प्रदिप सोनवणे आदी उपस्थित होते.

यात १७ वर्ष आतील मुलांच्या गटात प्रथम द. सेंट्रल स्कुल नागपूर, द्वितीय निर्मल इंटरनॅशनल स्कुल पाचोरा, तृतीय ऑल सेंट्रल हायस्कुल ठाणे यांनी यश मिळवले. १७ वर्षाच्या आतील मुलींच्या गटात प्रथम क्रमांक स्कॉटीश अ‍ॅकेडमी स्कुल परभणी, द्वितीय ऑल सेंट्रल हायस्कुल ठाणे, तृतीय सेंट यांनी यश मिळविले. व्यंकटेश स्कुल सांगली. राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेतील बेस्ट रायडर, सोनाली दुधगावकर, ऑल राऊंडर प्लेअर म्हणून गायत्री पटेल, परभणी यांनी बहुमान मिळवला. स्पर्धेत सहभागी झालेल्या संघाची व्यवस्था निर्मल इंटरनॅशनतर्फे उत्तम ठेवण्यात आली. यासाठी गणेश राजपूत, सुशांत जाधव, संतोष पाटील, नंदकिशोर पाटील, आसीफ खान, प्रशांत पाटील, उमेश ढगे, स्नेहल पाटील, वर्षा देशमुख, सिमा पाटील, नर्मदा पांडे, अश्विनी कुलकर्णी, शितल मोराणकर, अंजली अव्हाड यांनी अथक परिश्रम घेतले.

